REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# अण्णाभाऊ साठे यांचे प्रकाशित साहित्य, ग्रंथ, वर्तमान पत्रे , मासिके

प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.

**प्रस्तावना:-**

अण्णाभाऊ साठे यांनी स्वत: लिहिलेल्या कथा, कादबंऱ्या, लोकनाट्य, प्रवासवर्णने प्रकाशित झालेली आहेत, त्यामध्ये महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य मंडळ यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा एकखंड प्रकाशित केलेला आहे. त्यामध्ये दहा कादंबऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे,त्यानंतर संपादक दीपक चांदणे आणि अस्मिता चांदणे यांनी ऑगस्ट २०१२ मध्ये शाहु प्रकाशन प्रतिमा प्रकाशन, भोसरी पुणे याद्वारे अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा एकखंड प्रकाशित केलेला आहे, यामध्ये दहा कादंबऱ्यांचा समावेश केलेला आहे, त्यामध्ये आघात, फकिरा, आग, चित्रा, आवडी, माकडीचा माळ, रानबोका, संघर्ष, वैजयंता, वारणेचा वाघ या कादंबऱ्यांचा समावेश आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा दुसरा खंड प्रा.लक्ष्मण ढोबळे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक चांदणे आणि अस्मिता चांदणे यांनी संपादित केलेला असून, प्रतिमा प्रकाशन पुणे यांद्वारे १ ऑगस्ट २०१५ रोजी प्रकाशित केलेला आहे. या खंडामध्ये एकूण दहा कादंबऱ्यांचा समावेश आहे, त्यामध्ये अहंकार, चंदन, कुरुप, वैर,तारा,चिखलातील कमळ, पाझर, केवड्याचं कणिस, अग्निदिव्य, मयुरा या कादंबऱ्या आहेत. उपरोक्त दोन्ही समग्र वाङ्मयांचा प्रस्तुत संशोधन अध्ययनाकरीता तथ्य संकलन आणि विश्लेषणासाठी वापर करण्यात आलेल्या आहे.

## ❖ अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची समीक्षा करणारे इतर प्रकाशित ग्रंथ :-

प्रख्यात संशोधक, साहित्यीक आणि विचारवंत बाबुराव गुरव यांनी "अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन" या शिर्षकाखाली एक संदर्भ ग्रंथ लिहीलेला असून, तो न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेरा गुप्ता भवन ८५, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई येथे मुद्रित करुन प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय गृह भूपेरा गुप्ता भवन, प्रभादेवी मुंबई यांनी प्रकाशित केलेला आहे याची पहिली आवृत्ती जानेवारी १९९१, दुसरी आवृत्ती जुलै १९९ आणि तिसरी आवृत्ती जानेवारी २००८ मध्ये प्रकाशित करण्यात आलेली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनातील समाज विचाराचे विवेचन करण्यात आलेले आहे. अण्णाभाऊ साठे यांच्यावर कार्ल मार्क्स यांच्या मार्क्सवादाचा असलेला प्रभाव व त्यातून वर्ग संघर्षावर अण्णाभाऊंनी दिलेला लढा व विचार विषद करण्यात आलेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांच्या समाज जाणीवा व उपेक्षित समाजाचे स्वरुप प्रामुख्याने त्यांच्या साहित्यकृतीतून अभिव्यक्त झालेलाआहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या, कादंबरी व कादंबरी लेखनाची समीक्षा करण्यात आलेली आहे, त्यामध्ये त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनामागील प्रेरणा, अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनातील स्त्रीवाद, अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील ग्रामीण जीवन दर्शन व वास्तविकता व अण्णाभाऊ साठे यांचा या लेखनामागील व्यवस्था परिवर्तनाचा हेतू याचे विस्तृत विवेचन केलेले आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या कथा लेखनाची समीक्षा करण्यात आलेली आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या कथामधील व्यवस्था परिवर्तनासाठी संघर्ष करणाऱ्या नववर्गाचे चित्रण करण्यात आलेले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी समाजामधील कुप्रथा, विघातक रुढी परंपरा, बंदकरुन नवीन समाजाची निर्मिती करण्यासाठी व्यक्त केलेल्या विचारांची समीक्षा करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे धर्म आणि जातीच्या ओझ्याखाली जीवन जगण्याचा संघर्ष करणाऱ्या दलित समाजाचे वास्तव दलित संघर्ष वास्तववादी चित्रण करण्यात आलेले आहे. त्यानंतर सदरील प्रकरणामध्ये आत्मचरित्र कथांचाही उल्लेख करण्यात आलेला आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठेंनी ज्या आत्मचरित्र कथा लिहिल्या त्या वास्तविकपणे खऱ्या आणि अण्णाभाऊ साठेंनी स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना भेटलेल्या माणसांच्या सत्य जीवन पटावरील कथा आहेत.

अण्णाभाऊ साठे यांची मार्क्सवादी शाहिरी याचा आढावा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील शाहिरी परंपरा आणि अण्णाभाऊंची शाहिरी यातील फरक स्पष्ट करत असतांना अण्णाभाऊ साठेंनी मार्क्सवादी विचारधारा व डॉ.आंबेडकरवादी विचारधारा यांचा वास्तववादी

समन्वय कशा प्रकारे केला व शाहिरीतून समाज जागृतीची व परिवर्तनाची चालविलेली नवीन संघर्षमय चळवळ विषद केलेली आहे, त्याचप्रमाणे राजकीय लढ्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे योगदान यामध्ये विषद करण्यात आलेले आहे.

अण्णाभाऊ साठेंच्या नाटक, प्रवास वर्णन आणि इतर साहित्याचे विवेचन करण्यात आलेले आहे, यामध्ये लिखित आणि अप्रकाशित साहित्याचाही उल्लेख करण्यात आलेला आहे. संदर्भ ग्रंथाच्या सहाव्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊ साठे एक आकलन या शिर्षकाखाली सारांशरुपी उपसंहार विषद केलेला आहे.

प्राचार्य डॉ.माधव गादेकर यांनीही' अण्णाभाऊ साठे :साहित्य मूल्यमापन' या शिर्षकाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादला आपला विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता प्रबंध सादर केलेला आहे, व त्यावर त्यांना पीएच.डी पदवी बहाल केलेली आहे, त्यामध्ये एकूण सात पकरणे असून,त्यातील पहिल्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊ आणि त्यांचे समकालीन यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. तर दुसऱ्या प्रकरणामध्ये मराठी साहित्य मापदंड आणि अण्णाभाऊंचे साहित्य याची तुलना आणि साम्य विशद केलेले आहे. प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचा प्रभाव रेखाटलेला आहे. चौथ्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंच्या साहित्यातील व्यक्तिरेखांवर प्रकाश टाकलेला आहेत. त्यानंतर प्रबंधाच्या पाचव्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंच्या 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवास वर्णनाचा आढावा घेण्यात आलेला आहे. सहाव्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंची शाहीरी व तिचा आशय, संदर्भ आणि वेगळेपण स्पष्टकेलेले आहे. प्रबंधाच्या सातव्या प्रकरणामध्ये अण्णाभाऊंची लोकनाट्य, नाटक व चित्रपट यांचा आढावा घेण्यात आलेला आहे, या प्रबंधाचे ग्रंथरुपी प्रकाशन १८ जुलै २०११ रोजीसादर प्रकाशन औरंगाबाद यांच्याद्वारे करण्यात आलेले आहे .हा प्रबंध प्रस्तूत संशोधन अध्ययनासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे अभ्यासकांनीही मान्य केल्याचे दिसून येते कारण यामध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचा उद्देश आणि आशय स्पष्ट करण्यात आलेला आहे.

नानासाहेब कठाळे यांनी"अण्णाभाऊ साठे : जीवन आणि साहित्य" हा ग्रंथ १९९६ मध्ये लिहून समता सैनिकदल प्रकाशन आणि प्रसारण व्यवस्था यांच्याद्वारे प्रकाशित केलेला असून अण्णाभाऊ साठे आणि कुटूंबियांबद्दल सखोल माहिती यामध्ये दिलेली आहे. त्याचप्रमाणे अण्णाभाऊंची व्यक्तिरेखा, व्यक्तिमत्व कसे घडले यावर प्रसंगानुरुप प्रकाश टाकण्यात आलेला आहे तसेच अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यावरही चर्चा करण्यात आलेली आहे. अण्णाभाऊंच्या साहित्याचा आशय आणि जाणिवा तसेच अण्णाभाऊंचे जीवन आणि कार्य, त्यांची चळवळ या बाबी समजण्यासाठी सदरील ग्रंथ अत्यंत आयुक्त ठरला म्हणून प्रस्तूत संशोधन अध्ययनासाठी याचा वापर करण्यात आलेला आहे.

डॉ.राजेंद्र गोणारकर यांनी अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या "बुध्दाची शपथ" हीकथा अण्णाभाऊ साठेंच्या वैचारिकपणासाठी दिशा दिग्दर्शित करते. अण्णाभाऊ साठे हे तरुणपणी कम्युनिष्ट साम्यवादी विचाराने भारावले,वर्ग विरहीत,शोषण विरहीत समाज निर्माण व्हावा, सर्वहारा वर्गाचे अत्यान व्हावे या विचाराने ते झपाटले. त्यातूनच समाजाशी असलेल्या बांधिलकीने, जग सुंदर बनवण्याच्या ध्येयवादी आकांक्षेने ते वर्ग लढ्याशी अभिन्न जोडले गेले होते. स्वातंत्र्य मिळाले असले तरी सर्वहारा वर्गाचे राज्य आले नाही असे त्यांचे मत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतरकरण्यामागे दोन उद्देश होते. एक म्हणजे विषमतावादी मूल्य,संस्कृतीला नकार आणि त्याचवेळी मानवतावादी, समतावादी, इहवादी संस्कृतीचा स्वीकार 'सापळा' हीकथा ज्याप्रमाणे जुन्या जीवन मुल्यांना नकार देणारी कर्मट परंपरांना नाकारणारी आहे,त्याप्रमाणे 'बुध्दाची शपथ' ही नव्या मूल्यांचा स्वीकार करणारी कथा आहे,ही परिवर्तनवादी विचारांना दर्शवणारी कथा आहे. भारतीय संविधानास अपेक्षित असणारी समता, न्याय, बंधुता हीमूल्य 'बुध्दाची शपथ' या कथा संग्रहातून प्रतिबध्द आणि प्रतित होताना दिसून येतात, म्हणजेच अण्णाभाऊ साठे यांना मानव मुक्तीच्या चळवळीमध्ये, लोकशाही मुल्ये अपेक्षित होती हे यावरुन दिसून येते म्हणून या कथासंग्रहाचा प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी वापर करण्यात आलेला आहे.

'साहित्यातील तेजस्वी तारा: अण्णाभाऊ साठे या शिर्षकाखाली डॉ.मनोहर रोकडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन आणि कार्याचा मागोवा घेणारा आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन आणि कार्याचा मागोवा घेणारा तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची समिक्षा करणारा ग्रंथ लिहून तो साधना सेवा प्रकाशन लातूर यांच्याद्वारे २०१५ मध्ये प्रकाशित केलेला आहे,त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन आणि कार्यामधून मिळणाऱ्या प्रेरणांसह, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची समीक्षा करत त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यांच्या मतानुसार अण्णाभाऊ साठे यांचे लिखान हे कथा कादंबऱ्यांच्या माध्यमातून प्रकाशित झालेले असले तरी त्यामध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक विचारांची बैठक असून, समाजातील अनेक समस्यांचे प्रतिबिंब आणि त्या समस्यांच्या निराकरणाकरीता आवश्यक उपदेशात्मक उपाययोजना यांची अभिव्यक्ती त्यातून व्यक्त होते. म्हणून त्या साहित्याचा विविध दृष्टीकोणातून शोध घेणे गरजेचे आहे. डॉ.मनोहर रोकडे यांनी या संदर्भ ग्रंथामध्ये अण्णाभाऊ साठे यांचे' भारत छोडो' आणि 'चले जाव' आंदोलनामधील योगदानाचा आढावा घेतलेला आहे. क्रांतीसिंह नाना पाटील आणि बरडे गुरुजींच्या नेतृत्वाखाली आंदोलनातील सक्रिय सहभाग अण्णाभाऊ साठे यांच्यावरील पकड वॉरंट आणि त्यानंतरची अण्णाभाऊ साठेंची भूमिगत राहून केलेली कामगिरी याचा आढावा घेण्यात आलेला आहे म्हणून सदरील ग्रंथ प्रस्तूत संशोधन अध्ययनासाठी उपयुक्त ठरलेला आहे. प्रा.सुरेश चौथाईवाले यांनी 'महाराष्ट्रातील मातंग जातीच्या वास्तव समस्या' या शिर्षकाखाली संदर्भ ग्रंथ लिहिलेला असून लहुजी प्रकाशन औरंगाबाद यांनी तो २ ऑक्टोबर २०१० रोजी प्रकाशित केलेला आहे. यामध्ये प्रा.सुरेश चौथाईवाले यांनी मातंग जातीवर आणि अण्णाभाऊ साठे यांच्यावर वैचारिक व अभ्यासूवृततीने चिंतन केलेले आहे. असे आपल्या प्रस्तावनेमध्ये डॉ.दिलीप अर्जुन यांनी म्हटलेले आहे.

सदरील संदर्भ ग्रंथामध्ये प्रा.सुरेश चौथाईवाले यांनी अण्णाभाऊ साठे आणि मातंग जातीच्या समास्यांवर संशोधनात्मक अध्ययन करुन मांडणी केलेली असल्याचे दिसून येते, तसेच सदरील ग्रंथामध्ये अण्णाभाऊ साठेंच्या कथेतील आंबेडकरी विचार मांडलेले आहेत.त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी नाते जपणारे अण्णाभाऊ साठेंचे साहित्य विचार प्रतिबिंबीत केलेले आहेत. त्याचप्रमाणे अंधश्रध्दा, अनिष्ठरुढी, परंपरा, कर्मकांड यांना झुगारुन वैज्ञानिक दृष्टिकोणाचा पुरस्कार केलेले अण्णाभाऊ साठे यांचा विज्ञानवाद विषद केलेला असून, अण्णाभाऊ साठेंच्या पोवाड्यातून परिवर्तनवादी विचारांचा आढावा घेण्यात आलेला आहे, म्हणून प्रस्तुत ग्रंथाचा सदरील संशोधन अध्ययनाकरीता वापर करण्यात आलेला आहे.

प्रा.सुरेश चौथाईवाले यांनी 'अण्णाभाऊ साठे व मातंग समाज' या शिर्षकाखाली एक ग्रंथ लिहिलेला असून तो लहुजी प्रकाशन औरंगाबाद यांनी २ ऑक्टोबर २०१० मध्ये प्रकाशित केलेला आहे. या ग्रंथामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कथांचे समीक्षण केलेले आहे तर काही लेख ज्यामध्ये अण्णाभाऊ साठेंच्या मृत्युनंतर शाहीर अमर शेख यांनी लिहीलेल्या वर्तमानपत्रामध्ये प्रकाशित झालेला लेख व महाराष्ट्र टाईम्स, प्रबुध्द भारत, लोकसत्ता इ. मध्ये प्रसिध्द झालेले लेख वाचकांसाठी ठेवण्यात आलेले आहेत. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्वाचा वेध घेण्यात आलेला आहे. अण्णाभाऊ साठे यांचे बहुआयामी व्यक्तीमत्व अभ्यासण्याकरीता सदरील ग्रंथ उपयुक्त ठरला. म्हणून सदरील ग्रंथाचा प्रस्तूत संशोधन अध्ययन करीता वापर करण्यात आलेला आहे.

अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ.दिलीप अर्जुने यांनी 'आर्थिक विषमतेविरुध्दचा झंझावात' या शिर्षकाखाली एका संदर्भाग्रंथाचे संपादन केलेले असून, सादर प्रकाशन औरंगाबाद यांनीते दि.१४ एप्रिल २०१४ रोजी प्रकाशित केलेले आहे.

अण्णाभाऊ साठेंच्या बहुआयामी व्यक्तीमत्वाबद्दल अधिक जाणून घेण्याच्या उद्देशाने, आर्थिक दृष्टिकोणातून शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या ग्रंथामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्यावर विविध दृष्टिकोणातून लिहिलेल्या प्राध्यापकांच्या संशोधन शोध निबंधांचा समावेश करण्यात आलेला आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याच्या प्रयत्नासह अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याचे तत्वज्ञान त्यांचा वैश्विक दृष्टीकोन, त्यांचा समतेचा लढा, फुले-आंबेडकरी चळवळीचे वारसदार, अण्णाभाऊ साठे एक राष्ट्रव्यापी नेतृत्व या शिर्षकाखाली शोधनिबंध प्रकाशित करण्यात आलेले आहेत.अण्णाभाऊ साठेंना केवळ मराठी साहित्यापुरते मर्यादीत न ठेवता त्यांच्या विचारांचे इतर पैलू उलगडण्याचा प्रयत्न या ग्रंथामध्ये करण्यात आलेला आहे. म्हणून सदरील संदर्भ ग्रंथाचा प्रस्तूत संशोधन अध्ययनाकरीता उपयोग करण्यात आलेला आहे.

'परिवर्तनवादी विचारवंत : अण्णाभाऊ साठे या शिर्षकाखाली' चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी एक ग्रंथ लिहिलेला आहे आणि तो साद प्रकाशने औरंगाबाद यांनी दुसरी आवृत्ती १६ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रकाशित केलेली आहे. यामध्ये अण्णाभाऊ साठे यांची परिस्थिती आणि त्यातून त्यांना सामाजिक परिवर्तनाची मिळालेली प्रेरणा आणि दिशा याचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठे यांचे सक्रिय योगदान याचा शोध घेण्यात आलेला आहे. म्हणून सदरील ग्रंथ प्रस्तूत संशोधन अध्ययनाकरीता वापरण्यात आला आहे.

प्रा.रणधीर शिंदे यांनी 'अण्णाभाऊ साठे साहित्य- समीक्षा' या शिर्षकाखाली एका संदर्भ ग्रंथाचे संपादन केलेले असून तो ग्रंथ श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर, यांनी २०११ मध्ये प्रकाशित केलेले आहे. यामध्ये प्रख्यात लेखकांचे शोधनिबंध प्रकाशित करण्यात आलेले आहेत, यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची समीक्षा करुन, त्याचा आशय आणि विषय विषद केलेला आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनामागची प्रेरणा आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्वज्ञान याचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे, त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठेंच्या दलित साहित्य उद्घाटनाच्या भाषणाचे परिशिष्ट जोडण्यात आलेले आहे. या समिक्षांमधून अण्णाभाऊ साठेच्या विचारांची बैठक आणि लिखानामागील प्रेरणा आणि वास्तवता याचा शोध घेण्याससदरील ग्रंथ उपयुक्त ठरला म्हणून सदरील ग्रंथाचा प्रस्तूत संशोधन अंध्ययनाकरीता वापर करण्यात आलेला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे (महाराष्ट्र शासन) यांनी जुलै २०१५ मध्ये "लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे गौरवग्रंथ" हा संदर्भ ग्रंथ प्रकाशक आणि संपादक महासंचालक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था पूणे यांद्वारे प्रकाशित केलेला असून, यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्यावर संशोधन अध्ययन करणाऱ्या प्रख्यात लेखकांचे २३ शोधनिबंध समाविष्ट केलेले आहेत. हे २३ शोधनिबंध अण्णाभाऊ साठेंच्या व्यक्तिमत्वाचे आणि विचारांचे विविध पैलू वाचकांसमोर मांडताना दिसून येतात. या शोधनिबधांच्या माध्यमातून विविध अंगाने, आंतरराष्ट्रीय (वैश्विक) दृष्टिकोनातून अण्णाभाऊ साठेंचा शोध घेण्यात आलेला असून, या संदर्भ ग्रंथाचा प्रस्तूत संशोधन अध्ययनाकरिता वापर करण्यात आलेला आहे.

### ❖ वर्तमान पत्रे:-

**१ 'दैनिक लोकमत' :-** हे विभागीय दैनिक असून औरंगाबाद व लातूर येथून मुद्रितहोऊन औरंगाबाद मधून प्रकाशित होते. याचे मुख्यसंपादक विजय कुवळेकर व संपादरसुधीर महाजनहे आहेत. साप्ताहिक मंथन पूरवणीतील लेख, अग्रलेख, बातम्यांच्या माध्यमातून तथ्य संकलनकरण्यात आले आहेत.

**२ 'दैनिकसकाळ' :-**हेविभागीय दैनिक असून जालना व सोलापूर मध्ये मुद्रितहोऊन औरंगाबाद येथे प्रकाशित होते, याचे मुख्यसंपादकश्रीराम जयसिंग पवार व कार्यकारीसंपादक संजय वरकड हे असूनसंपादकीय लेख, अग्रलेख व बातम्यांच्या माध्यमातून तथ्यसंकलनहे वर्तमानपत्र सहाय्यकठरले.

३ **'दैनिक लोकसत्ता' :-**हे विभागीय दैनिक असून महाराष्ट्रामध्ये दर्जेदार अग्रलेखकांसाठी प्रसिध्द आहे. याचे संपादक गिरीश कुबेर हे आहेत. यामधील बातम्या संपादकीय लेख व अग्रलेखांच्या माध्यमातून तथ्य संकलनास सहाय्यक ठरले. दैनिक पार्श्वभूमी, स्थानिक वर्तमानपत्र, बीड दैनिक चंपावतीपत्र, स्थानिक वर्तमानपत्र, बीड. दैनिक झुंजार नेता, स्थानिक वर्तमानपत्र, बीड. सायं.दैनिक रिपोर्टर स्थानिक वर्तमानपत्र, बीड. दैनिक आनंदनगरी स्थानिक वर्तमानपत्र जालना या स्थानिक वर्तमान पत्रांचाही उपयोग संशोधनात करण्यात आला आहे.

### ❖ मासिके / त्रैमासिके /साप्ताहिके :-

**१ लोकराज्य नोव्हें.१९९३ माहिती व तंत्रज्ञान विभाग, जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांच्याद्वारे,प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'लोकराज्य' या प्रसिध्द मासिकाने १ नोव्हेंबर १९९३ ला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विशेषांक प्रकाशित करुन प्रसिध्द केला. यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार व सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या संदेशासह शाहीर आत्माराम पाटील, नारायण सुर्वे, प्रा.डॉ.बाबुराव गुरव, डॉ.सदा कव्हाडे इत्यादी प्रख्यात लेखकांचे लेख प्रकाशित करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने अत्यंत उशिरा का होईना अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन आणि कार्याचा गौरव करण्यासाठी आणि ते संबंध महाराष्ट्रातील दृष्टीक्षेपास वाचनास ठेवण्यासाठी प्रकाशित करण्यात आलेलाहा विशेषांक अण्णाभाऊ साठे यांना एका प्रकारे देण्यात आलेली मानवंदना म्हणून ओळखला जातो.

मराठी साहित्य विश्वातील अण्णाभाऊ साठेंचे स्थान आणि अण्णाभाऊ साठेंचे मराठी साहित्याच्या तसेच दलित साहित्याच्या चौकटी बाहेर जावून आंतर विद्याशाखीय दृष्टिकोणातुन लेखनाच्या सर्वांगीन कौशल्याच्या वापराने निर्माण केलेले साहित्य याचा मागोवा घेण्यात आलेला असून, काही टिकाही करण्यात आलेल्या आहेत. अण्णाभाऊ साठेंनी दृष्टिक्षेपास पडतील ते सर्व विषय हाताळताना साहित्य रचनेच्या मर्यादा ओलांडून चाकोरीबध्द चौकटीच्या बाहेर जावून, प्रबोधनात्मक लिखन केलेले आहे. परंतू त्याची तात्विक बैठक तसूभरही ढळू दिली नाही. या पैलूचा मागोवा अण्णाभाऊ साठे विशेषांकामध्ये घेण्यात आलेला आहे. म्हणून या विशेषांकाचा वापर करुन तथ्य संकलन आणि विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**२ योजना-ऑगस्ट-२००२, २००६**

**शासकीयअभिलेखे :-**

**संशोधन अहवाल :-**

१) बाबुराव गुरव (१९८०) "अण्णाभाऊ साठे : समाज विचार आणि साहित्य विवेचन" शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मार्गदर्शक : प्रा.एस.एस.भोसले

२) धावडे आशा (१९८९) : अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय, नागपूर विद्यापीठ नागपूर, मार्गदर्शक प्रा.यशवंत मनोहर.

### सारांश व निष्कर्ष :-

तथ्य संकलनाच्या द्वितीयक स्त्रोतामध्ये जी तथ्ये संशोधकाच्या स्वतःच्या मालकीची नसून इतरांकडून ती संकलित केलेली असतात. त्यास द्वितीयक स्त्रोतातुन संकलित केलेली तथ्ये असे म्हणतात. यामध्ये व्यक्तिगत प्रलेख ज्यात स्वचरित्रे, आत्मचरित्रे, दैनंदिनी, पत्रे, संस्मरणे, सार्वजनिक प्रलेख ज्यामध्ये आयोग परिषदा व समितीचे संशोधन संस्थांचे, आंतर राष्ट्रीय प्रकाशित अहवाल, शासकीय गॅझ ेटर, पुस्तके वर्तमानपत्रे, मासिके व अप्रकाशित शासकीय रेकॉर्ड, दुर्मिळ प्रलेख, संशोधन अहवाल इत्यादींचा समावेश होतो. वरील साधनांमधून संकलीत केलेल्या माहिती, तथ्यांना द्वितीयक तथ्ये असे म्हणतात व त्यांच्या संकलन पध्दतीला द्वितीयक स्त्रोत असे म्हणतात. तथ्य संकलन त्याचे वर्गीकरण त्यांचे विश्लेषण आणि त्याद्वारे निष्कर्ष काढणे म्हणजेच संशोधन होय.

### संदर्भ सुची :-

१. देगलुकर चंद्रप्रकाश,"परिवर्तनवादी विचारवंतः अण्णाभाऊ साठे," साद प्रकाशन, औरंगाबाद,२०१३ पृ.क्र. २७
२. कठाळे नानासाहेब, पुर्वोक्त, पृ.क्र. १०३
३. अण्णाभाऊ साठे,"माझा रशियाचा प्रवास," गुलाबराव कारले, सुरेश एजन्सी, पुणे, १९७९ पृ.क्र. ४४
४. कठाळे नानासाहेब, पुर्वोक्त, पृ.क्र. ६१
५. तत्रैव, पृ.क्र. १२४
६. अण्णाभाऊ साठ, "फकिरा", सुरेश एजन्सी, मुंबई, १९८८ पृ.क्र. ८८